सामना पा.नं.3०

# लायसन्स रिन्यू न केल्यास दंड भरावाच लागेल

## निष्काळजी वाहनचालकांना हायकोर्टाची तंबी

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – ड्रायव्हिंग लायसन्सचे वेळीच नूतनीकरण न केल्यास अतिरिक्त शुल्काचा भार सोसावाच लागणार आहे. ड्रायव्हिंग लायसन्स वा वाहन नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण, पत्त्यात बदल, वाहन मालकी हस्तांतरित करणे ही कामे निर्धारित वेळेनंतर केल्यास वाहनचालकाकडून अतिरिक्त शुल्क आकारण्याचा केंद्र सरकारला अधिकारच आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे.

ऑटो रिक्षा संघ आणि मुंबई बस मालक संघटनेच्या दोन स्वतंत्र याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने निर्णय दिला.



ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण आदी कामांच्या विलंबाबद्दल अतिरिक्त शुल्क आकारण्याची तरतूद चुकीची आहे. अतिरिक्त शुल्काच्या बदल्यात कोणत्याही अतिरिक्त सेवा पुरवल्या जात नाहीत. मोटार वाहन कायदा अशा प्रकारे कोणतेही अतिरिक्त शुल्क लादण्यास मुभा देत नाही, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला.

### कोर्टाची निरीक्षणे

- दंड हा प्रतिबंधक आहे हे सर्वज्ञात आहे. मात्र या प्रकरणात १९८९ च्या नियमांच्या तरतुदींनुसार विहित केलेल्या अतिरिक्त शुल्काची आकारणी कोणत्याही प्रकारचा अडसर नाही. वाहने प्रशिक्षित व्यक्तींद्वारे चालविली जातील, याची खबरदारी सरकारच्या नियमावलीद्वारे घेतली जात आहे.
- ड्रायव्हिंग लायसन्स वा वाहन नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण, पत्त्यात बदल, वाहन मालकी हस्तांतरित करणे ही कामे विलंबाने केल्यास अतिरिक्त शुल्क आकारण्याचा केंद्र सरकारला मोटार वाहन कायद्याच्या कलम २११ अन्वये अधिकार आहे.
- केंद्र आणि राज्य सरकारला मोटार वाहन कायद्यांतर्गत अर्जांवर प्रक्रिया करणे, कागदपत्रांमध्ये सुधारणा, प्रमाणपत्रे जारी करणे, परवाने, परवानग्या यांसारख्या कायद्यांबाबत शुल्क आकारण्याचे तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम ६४ आणि ११० अंतर्गत नियम बनवण्याचा अधिकार आहे.
- सरकार सार्वजनिक हितासाठी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही वर्गातील व्यक्तींना कोणतेही शुल्क अंशत: किंवा पूर्ण भरण्यापासून सूट देऊ शकते.
- ड्रायव्हिंग लायसन्स नूतनीकरण, वाहन नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण, पत्त्यात बदल करणे व वाहन मालकी हस्तांतरित करणे याबाबत परिवहन विभागाने आकारलेल्या अतिरिक्त शुल्काला कोणत्याही प्रकारे दंड म्हणता येणार नाही.

CamScanner

सकाळ पा. नं. ३.

# ग्राहकाला अटक करता येणार नाही!

## वेश्यागृहातील कारवाईप्रकरणी उच्च न्यायालयाचा निर्वाळा

मुंबई, ता. ७ : वेश्यागृहावर टाकलेल्या छाप्यात नेहरूनगर पोलिसांनी तीन वर्षांपूर्वी अटक केलेल्या एका ग्राहकाला न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. वेश्यागृहातील ग्राहक हा 'भादंवि' कलम ३७०च्या कक्षेत मोडत नसल्यामुळे त्याला अटक करता येणार नसल्याचे सांगत न्यायाधीश भारती डांगरे यांनी ग्राहकाची जामिनावर सुटका केली आहे.

नेहरूनगर पोलिसांनी २०२१ मध्ये वेश्यागृहावर छापा टाकला होता. त्यावेळी या ग्राहकाला पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर त्याच्याविरुद्ध पोक्सो आणि अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली. त्यानंतर त्याने जामिनासाठी उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. या अर्जावर न्या. डांगरे यांच्या एकलपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी आरोपीतर्फे ॲड. प्रभंजय दवे यांनी युक्तिवाद केला. त्यावेळी सांगण्यात आले की, 'आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे; मात्र वेश्यागृहातील मुलगी अल्पवयीन असल्याची त्याला कल्पना नव्हती. त्यामुळे पोलिसांची कारवाई चुकीची असून अर्जदाराला जामीन देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

### सतत भेट देणारा नसेल...

मुंबई उच्च न्यायालयाने याबाबतचा निकाल देताना कोलकाता उच्च न्यायालयातील 'सुरेश बाबू विरुद्ध पश्चिम बंगाल' या प्रकरणाचा दाखला दिला. या निकालानुसार पैसे देऊन लैंगिक सुख उपभोगण्यासाठी वेश्यागृहात जाणारा ग्राहक हा 'सेक्स वर्कर' वा वेश्यागृहाला सतत भेट देणारा नसेल, तर त्याच्याविरुद्ध भादंवि कलम ३७० अन्वये गुन्हा दाखल करू शकत नाही, असे कोलकाता उच्च न्यायालयाने म्हटले होते.

सामना पा. नं. ७

# पैशासाठी डांबून ठेवल्याच्या रागातून मित्राने केली हत्या

वसई, दि. ७ (सा.वा.) - पैशाचा तगादा आणि त्यासाठी रात्रभर डांबून ठेवल्याच्या रागातून मित्रानेच हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. बलराम उर्फ बळीराम असे हत्या करणाऱ्याचे नाव असून त्याने आपला मित्र ब्रिजेश चौरसिया याला खदानित ढकलून जीवे मारले. याप्रकरणी पोलिसांनी बलरामविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

१७ जानेवारी रोजी धानिव पांढरीपाडा परिसरातील गुंजाळकर यांच्या दगडी खदानित अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करत तपासाला सुरुवात केली होती. दरम्यान हा मृतदेह जाबर पाड्यातील ब्रिजेश चौरसिया याचा असल्याचे निष्पन्न झाले. कुठलाही पुरावा नसताना पोलिसांनी शिताफीने तपास करून बलराम याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. बलराम याने ब्रिजेशकडून ५५ हजार रुपये उसनवारीने घेतले होते. मात्र नंतर ब्रिजेशने शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर तीन लाख रुपये घेतल्याचे जबरदस्तीने लिहून घेतले. त्यानंतर त्याने बलरामला रात्रभर डांबून ठेवले होते.

CamScanner

पुण्यनगरी पु.पा.१.

# जर्नालिस्ट युनियन कडून इफ्तार पार्टी

**। मीरा रोड** : मीरा भाईंदर शहरात सर्व धर्म समभाव मानत जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र या पत्रकारांच्या संघटनेने इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. मीरा भाईंदर शहरात जानेवारी महिन्यात दोन समाजात तेढ निर्माण झाले होते.त्यावेळी शहरातील पत्रकारांनी सर्व राजकीय पदाधिकाऱ्यांना एकत्र आणून शहरात शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनानंतर शहर शांत झाले होते. आता निवडणुका आल्यामुळे काही राजकीय लोक शहर अशांत करण्यासाठी वादग्रस्त विधाने करत आहेत.त्यामुळे जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र या पत्रकारांच्या संघटनेने पुढाकार घेऊन सर्व समाजातील नागरिकांना एकत्र आणून इफ्तार पार्टीचे जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र मीरा भाईंदर युनिटचे अध्यक्ष निलेश फापाळे ,उपाध्यक्ष शकील अहमद, सचिव प्रमोद देठे व इतर पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात शहरातील राजकीय पक्षाचे पदाधिकारी तसेच हिंदू, मुस्लिम व इतर समाजातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# महिलेची आत्महत्या



नालासोपारा : नागिनदास पाडा येथील सनी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या राजमती कनोजिया (३८) या महिलेने आत्महत्या केली. तिने शुक्रवारी सकाळी बेडरूममधील पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तुळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

लोकमत पु.पा.१.

# फसवणुकीतील साडेचार लाख पोलिसांनी मिळवून दिले परत

**। मीरा रोड** : काशिमीरा परिसरात राहणाऱ्या महिलेला शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन गुंतवणूक करण्यास सांगून, फसवणूक केलेले साडे चार लाख रुपये काशीगाव पोलीसांनी तपास करून परत मिळवून दिले आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा परिसरात राहणाऱ्या तहसिना अफ्रोज खान यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक केल्यास जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्यानंतर त्यांना ऑनलाईन पैसे गुंतवण्यास सांगून त्यांची आर्थिक फसवणूक केली होती. या फसवणूकीबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या तक्रारीची तत्काळ दखल घेवून तक्रारदार यांच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँकखात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्या




अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठवण्याबाबत संबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयित खात्यामध्ये रक्कम गोठवण्यात आली. त्यानंतर न्यायालयाकडून तक्रारदार यांची रक्कम परत मिळण्यासाठी काशीगाव पोलीस ठाणेचे अधिकारी, अंमलदार यांनी वेळोवेळी पाठ पुरावा केला. तक्रारदार यांची फसवणूक झालेले साडे चार लाख रुपये रक्कम त्यांच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आली.

CamScanner

लोकमत ५.पा.१.

## तरुणीची आत्महत्या

नालासोपारा : नालेश्वरनगर येथील गणेश निवास येथे राहणाऱ्या हर्षदा जाबडे (२१) या तरुणीने विष पिऊन आत्महत्या केली आहे. तिने रागाच्या भरात घटनेच्या दिवशी विषारी औषध प्यायले. तिला उपचारासाठी प्रथम मनपा रुग्णालय व नंतर मुंबईच्या केईएम रुग्णालयात भर्ती केले. तिथे तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तुळींज पोलिसांनी गुरुवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## १० लाखांचा गुटखा पकडला

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील यू पी पंजाबी ढाब्याजवळ शुक्रवारी संध्याकाळी अमली पदार्थ विरोधी कक्षाच्या पोलिसांनी गुटख्याचा टेम्पो पकडला आहे. महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला ९ लाख ७२ हजारांचा तंबाखूजन्य गुटखा, ५ लाख ५० हजारांचा टेम्पो, १० हजारांचा मोबाइल असा एकूण १५ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. वाहतूक करणाऱ्या टेम्पोचालक राधेश्याम यादव (वय ४५) याच्या विरोधात पोलिस अंमलदार महेश पागधरे (४१) यांनी शनिवारी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## पोलिस सांगून वृद्धाला गंडा




नालासोपारा : तिरुपतीनगर येथील मधुवन पार्क येथे राहणारे पंकरासियस कुजूर (७१) आणि मुलगी आनंदी कुजूर हे दोघे २ एप्रिलला इंडियन बँकेत खात्यातील पैशाची विचारपूस करण्यासाठी गेले होते. त्यांची मुलगी बँकेत गेली असताना, त्यांच्याजवळ दोन आरोपींनी येऊन पोलिस असल्याची बतावणी करून त्यांच्या गळ्यातून सोन्याची अंगठी आणि चेन काढून ठेवण्यास सांगून हातचलाखी करत २५ हजार ५०० रुपये किमतीचे दागिने घेऊन जात फसवणूक केली आहे. अर्नाळा पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

## टेरेसवरून पडल्याने मृत्यू



नालासोपारा : विरारच्या पाच पायरी येथील साईलिला अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या संतोष गुरव (४६) यांचा टेरेसवरून खाली जमिनीवर पडल्याने मृत्यू झाला आहे. शुक्रवारी हे त्यांच्या टीव्हीच्या डिशचे सिग्नल येत नसल्यामुळे टेरेसवर जाऊन डिश मागे-पुढे करत होते. अचानक त्यांचा तोल जाऊन खाली जमिनीवर पडून जखमी झाले. त्यांना उपचारासाठी संजीवनी हॉस्पिटलमध्ये नेल्यावर तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. विरार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## संजीव नाईक यांचा ठाण्यातून प्रचार सुरू?

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरारोड : ठाणे लोकसभा मतदारसंघात माजी खासदार संजीव नाईक यांनी निवडणूक प्रचारास एकप्रकारे सुरुवात करत उमेदवारीसाठी भाजपकडून हिरवा कंदील मिळाल्याचे संकेत दिले आहेत; परंतु त्यांचे चिन्ह हे शिवसेनेचे सुद्धा असू शकते, असे वक्तव्य त्यांनी केले आहे.

संजीव नाईक यांनी भाईंदरच्या बालाजीनगरमधून रविवारी त्यांच्या प्रचाराची सुरुवात केली. एका सभागृहात त्यांनी स्थानिक रहिवाशांसोबत बैठक घेतली. त्यास भाजपचे माजी नगरसेवक व कार्यकर्तेही उपस्थित होते. पक्षाने आपल्याला उमेदवारीच्या अनुषंगाने हिरवा कंदील दिला आहे. प्रचाराची सुरुवात आपण बालाजीनगरमधून करत आहोत. आपली उमेदवारी जवळपास ९९ टक्के निश्चित असून चिन्ह कोणते असेल हे आपणास माहिती नाही. भाजपच्या चिन्हावरच निवडणूक लढवण्याची आपली तीव्र इच्छा आहे; परंतु श्रेष्ठी जो निर्णय घेतील त्या अनुषंगाने काम करणार आहोत, असे त्यांनी सांगितले.

लोकमत ५.४.१.

विविध साहित्य बाजारात दाखल

# गुढीपाडव्याच्या खरेदीसाठी बाजारपेठा, रस्ते गर्दीने फुल्ल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असलेल्या गुढीपाडव्याचा सण उद्यावर येऊन ठेपला असता, नागरिकांनी रविवारी सायंकाळी पाडव्याच्या खरेदीसाठी वसई, विरार, नालासोपाऱ्यांच्या बाजारपेठांमध्ये गर्दी केली होती. बाजारातील दुकानांमध्ये साखरगाठी, गुढीचे साहित्य, नवी काठी, कपडे, पूजेचे साहित्य तसेच मिनी गुढी यांसह विविध वस्तू खरेदी करण्यासाठी रात्री उशिरापर्यंत दुकानांमध्ये ग्राहकांची लगबग सुरू होती, तर मोठ्या संख्येने ग्राहक बाजारपेठांकडे वळल्याने रस्तेही गर्दीने फुलले होते.

गुढीपाडव्यानिमित्त वसई तालुक्यातील छोट्या-मोठ्या बाजारपेठा विविध वस्तूंनी सजल्या होत्या. नव्या वर्षाची सुरुवात पंचांगाचे पूजन करून, वाचन करून केली जाते. त्यासाठी नागरिकांकडून पंचांगाची खरेदी केली जात होती. महिलांनी पूजेसाठी, हारासाठी फुले, गाठ्या, गुढीचे पूजा साहित्य खरेदी केले. पाडव्याला गोड पदार्थ हमखास घरोघरी केला जातो. अनेकांनी महाग असले तरी आंबे खरेदीला पसंती दिली होती.

गुढीपाडव्याला खास मान असलेल्या साखरेच्या गाठी यावर्षी विविध रंगांमध्ये किमान दहा रुपयांपासून ते दीडशे रुपयांपर्यंत उपलब्ध होत्या, तर आकर्षक ड्रायफ्रूटच्या गाठीचा दर १०० ते २०० पर्यंत लांबीनुसार विक्री केली जात होती. बचत गटांनी केलेल्या रेडिमेड गुढ्यांनाही पसंती मिळत होती. तसेच ठिकठिकाणी सजावटीचे साहित्य खरेदीलाही गर्दी झाली होती.



रविवारी सायंकाळी गुढीपाडव्याच्या खरेदीसाठी वसई, विरार, नालासोपारा परिसरातील बाजारपेठांमध्ये नागरिकांनी गर्दी केली होती.

## वसईत गुढीपाडव्यानिमित्त निघणार शोभायात्रा

गुढीपाडव्याच्या निमित्ताने वसई, विरार आणि नालासोपारा शहरांमध्ये पारंपरिक वेशभूषा, चित्ररथ, सामाजिक संदेश देत ठिकठिकाणी शोभायात्रा काढण्यात येणार आहेत.

## इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू, वाहन खरेदीकडेही कल

ऑफिसमध्ये, टेबलवर, कारमध्ये ठेवता येण्यासारख्या छोट्या गुढीसह मोठ्या रेडिमेड गुढ्या पन्नास रुपयांपासून उपलब्ध होत्या, तर पाडव्याचा मुहूर्त साधून नवी वाहने, घरगुती उपकरणे खरेदीकडे अनेकांचा कल असल्याने इलेक्ट्रॉनिक्सच्या दुकानांतही गर्दी पाहायला मिळाली.

## मिनी गुढ्यांच्या खरेदीला प्रतिसाद

लहान आकर्षक दिसणाऱ्या गुढ्यांच्या खरेदीला ग्राहकांचा प्रतिसाद मिळत असून, १०० ते २०० पर्यंत आकारानुसार गुढी विक्री केली जात आहे. या तयार गुढ्यांचा कार आणि घरात पूजेसाठी वापर करीत आहेत.

# दुकानात किराणासोबत दारू-बियरचीही विक्री!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेस गणेश देवल नगर झोपडपट्टी येथील किराणा दुकानातून बेकायदा विक्री केला जात असलेला विदेशी व देशी दारूसाठा जप्त करत दोघांवर गुन्हा दाखल करत ताब्यात घेतले आहे.

सहायक निरीक्षक रघुनाथ नरोटे यांना माहिती मिळाली की, छोटू ऊर्फ चोधाराम चौधरी नावाचा व्यक्ती किराणा दुकानातून बेकायदा दारू विक्री करत होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांनी तत्काळ कारवाईचे निर्देश दिल्यानंतर नरोटे हे शिपाई प्रकाश कांबळेसह गणेश देवल नगर मधील हनुमान मंदिराजवळ असलेल्या छोटू चौधरी याच्या किराणा दुकानावर छापा टाकला. तेथे चौधरी हा दोघा गिऱ्हाईकांना दारू विक्री करत असताना सापडला.



## दोघांना घेतले ताब्यात

- पोलिसांनी दुकानात तपासणी केली असता देशी आणि विदेशी दारुच्या बाटल्या, बियर हे विक्रीसाठी ठेवल्याचे आढळून आले.
- पोलिसांनी दारूसाठा जप्त करत चौधरीसह त्याचा साथीदार मोहम्मद सत्तार हनीफ (२४, रा. शिमला गल्ली) या दोघांना ताब्यात घेतले.
- भाईंदर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. आरोपी नजीकच्या दादर वाईन शॉपमधून दारू खरेदी करायचे आणि झोपडपट्टीत किराणा दुकानातून जास्त दराने विक्री करत असल्याचे समोर आले आहे.

CamScanner